दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २५८
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, बुधवार, दि.३० एप्रिल २०२५







# पहलगाम हल्ल्यानंतर 'आयएसआय'चा मोठा कट उघडकीस !

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.२९, जम्मू काश्मीर :**

जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर गुप्तचर यंत्रणा कसून तपास करत आहे. या हल्ल्यामुळे पाकिस्तानची गुप्तचर संस्था खडख च्या कारवाया उघडकीस येत आहेत. आयएसआय गैर-स्थानिक नागरिक, पोलीस कर्मचारी आणि काश्मिरी पंडितांना टार्गेट करून श्रीनगर आणि गांदरबल जिल्ह्यांमध्ये हल्ले करण्याचे प्लन करत आहे. यासोबतच सुरक्षा दलांवर हल्ले होण्याची देखील दाट शक्यता वर्तवण्यात आलीये.



## आयएसआयकडून मोठ्या हल्ल्याचा कट

पहलगाममध्ये झालेल्या हल्ल्याच्या तपासातून आयएसआय आणखीन मोठे षडयंत्र रचत असल्याचे पुढे आले. गुप्तचर विभागाच्या माहितीनुसार, आयएसआय श्रीनगर आणि गांदरबल जिल्ह्यांमध्ये गैर स्थानिक नागरिक, पोलीस आणि काश्मिरी पंडितांना टार्गेट करून कट रचत आहे. २२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये हल्ला झाला. या हल्ल्याच्या काही वेळापूर्वी २१ एप्रिल २०२५ रोजी हाशेर पर्रे उर्फ हमजा (जिल्हा बांदीपोरा) नावाचा एक स्थानिक दहशतवादी आणि एक ग्राउंड वर्कर यांना क्रीरी गावातून पट्टण रेल्वे मार्गाकडे शस्त्रास्त्रांसह जाताना पाहण्यात आले.

## पोलीस आणि काश्मिरी पंडितांना टार्गेट करण्याची शक्यता

त्यामुळे दहशतवादी सुरक्षा दलांवर हल्ला करू शकतात, अशी एक मोठी शक्यता आहे. गुप्तचर संस्थांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दहशतवादी संघटना येत्या काही दिवसांमध्ये सुरक्षा दल आणि गैर-स्थानिक नागरिकांना टार्गेट करून हल्ले करण्याची योजना आखत आहेत. हे दहशतवादी उत्तर, मध्य आणि दक्षिण काश्मीरमध्ये सक्रिय आहेत. खोऱ्यात मोठ्या संख्येने रेल्वे कर्मचारी राहतात.

त्यामुळे रेल्वे कर्मचाऱ्याला लक्ष्य केले जाऊ शकते. रेल्वे सुरक्षा कर्मचारी अनेकदा त्यांच्या कॅम्प/बॅरेकमधून बाहेर पडून स्थानिक परिसरात आणि बाजारात फिरतात, त्यामुळे त्यांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी मोठे पाऊल उचलले जात आहेत. त्यामुळे या कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना टार्गेट केले जाऊ शकते. माहितीनुसार, पहलगाम हल्ल्याच्या तपासात डोंगराळ भागात राहणाऱ्या गुर्जर बकरवाल समुदायाच्या लोकांची चौकशी केली जाईल.

# थोडक्यात

## प्रेम संबंधामध्ये अडसर ठरणाऱ्या पतीचा पत्नीने काढला काटा



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२९, पारनेर (अहिल्यानगर) :** निघोज ते पाबळ रस्त्यावर १३ एप्रिल रोजी झालेल्या अपघाताच्या प्रकरणात धक्कादायक माहिती समोर आली आहे. हा अपघात नसून बाबाजी शिवाजी गायके यांचा खूनच झाला असल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे. अधिक धक्कादायक म्हणजे, त्याच्या पत्नीनेच परप्रांतीय प्रियकराच्या मदतीने हा खून केल्याचे निष्पन्न झाले आहे.

या प्रकरणात पारनेर पोलिसांनी अवघ्या २४ तासांत गुन्ह्याचा छडा लावत, मयताची पत्नी सुप्रिया बाबाजी गायके (वय २७, रा. निघोज) आणि तिचा प्रियकर जनकभाई भुपतभाई भिडभिडीया (रा. गुजरात) यांना अटक केली आहे.

पोलिस निरीक्षक समीर बारवकर, सपोनि नितीन खंडागळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि रणजित मारग, पोना गहिनीनाथ यादव, पोकॉ गोर्वधन जेवरे यांनी सात दिवस गुजरातमध्ये ठाण मांडून २४ एप्रिल रोजी आरोपी जनकभाईला अटक केली.

सुप्रिया गायके हिला १५ एप्रिल रोजीच अटक करण्यात आली होती. सुरुवातीला तिने उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र, पोलिसी खाक्या दाखवल्यानंतर तिने गुन्ह्याची कबुली दिली. तपासात स्पष्ट झाले की, सुप्रिया आणि जनकभाई यांच्यात अनैतिक प्रेमसंबंध होते. पती बाबाजी त्यांच्या संबंधात अडथळा ठरत असल्याने त्याला हटवण्याचा कट रचण्यात आला. १३ एप्रिल रोजी बाबाजी याचा राहत्या घरी डोक्यात धारदार शस्त्राने वार करून खून करण्यात आला. त्यानंतर त्याचे प्रेत मोटारसायकलसह निघोज-पाबळ रस्त्यावर टाकून अपघाताचा बनाव करण्यात आला.

१३ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता पोलिसांना निघोज-पाबळ रस्त्यावर एक अज्ञात व्यक्ती मृत अवस्थेत आढळल्याची माहिती मिळाली होती. सुरुवातीला अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. मात्र, शवविच्छेदन अहवालात बाबाजीच्या डोक्याला मार लागल्याने मृत्यू झाल्याचे नमूद होते. त्यामुळे पोलिसांनी तपासाची दिशा बदलली. पोलिस उपअधीक्षक संपत भोसले, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे आणि जिल्हा पोलिस अधीक्षक राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. या तपासामुळे एक बनावट अपघाताचे रुप दिलेला निर्घृण खून उघड झाला असून, पोलिसांनी दोन्ही आरोपींना गजाआड करून समाजात एक प्रकारचा इशारा दिला आहे. तपास अजून सुरू असून या प्रकरणात आणखी काही धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता आहे.

# पारनेर तहसील कार्यालयात मुलभूत सुविधांचा अभाव...

## * वृद्ध नागरिक व महिलांना सर्वाधिक अडचणी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२९, पारनेर (अहिल्यानगर) :** शहरातील तहसील कार्यालय डिजिटल युगात प्रवेश करत असताना देखील, येथिल भौतिक सुविधांचा पुरता अभाव आहे. नागरिकांची कामे ऑनलाईन पद्धतीने होत असली, तरी तहसील कार्यालय परिसरात पिण्याच्या पाण्याची, स्वच्छतागृहांची अवस्था अतिशय वाईट असल्याने त्याचा वापरही नागरिकांना करता येत नाही. व इतरही मूलभूत गरजांची कमतरता आहे. यामुळे भ्रष्टाचारात गुंतलेल्या तहसील कार्यालयाला जाग कधी येणार हा प्रश्नच आहे.

अनेकदा तहसील कार्यालयात कामासाठी येणाऱ्या नागरिकांना पाण्याच्या पाण्यासाठी विकत पाणी घेवून तहान भागवावी लागते. कार्यालयाच्या आवारात पिण्याच्या पाण्याची टाकी, शुद्ध पाण्याची सोय किंवा फील्टर यापैकी काहीच उपलब्ध नाही. परिणामी, उन्हाळ्याच्या या तडाख्यात लोकांना तहसीलमधील कामासोबतच पाण्याच्या शोधासाठी वणवण करावी लागत आहे.

कार्यालयात शौचालय असून ते वापरत नसल्याने तेथे घाणीचे साम्राज्य पसरले असून साफसफाई केली गेली नाही. नागरिक व कर्मचारी लघुशंका किंवा शौचालयासाठी इतरत्र भटकंती करावी लागते.

सर्वसामान्य नागरिकच नव्हे तर जेष्ठ नागरिकांनाही तहसील कार्यालयात योग्य प्रकारची वागणूक मिळत नाही. वयोवृद्ध नागरिकांना रांगेत तासन् तास आपल्या कामासाठी उभे रहावे लागते. त्यांच्यासाठी स्वतंत्र बसण्याची व्यवस्था नाही, तसेच एखादी सावली किंवा निवांतपणे विश्रांती घेता येईल अशी जागाही नाही. अनेक जेष्ठ नागरिक तहसील कार्यालयाच्या या असुविधांबाबत नाराजी व्यक्त करताना दिसतात. डिजिटल यंत्रणा आली खरी, पण आम्हाला अजून मुलभूत गोष्टी मिळालेल्या नाहीत. आम्ही वृद्ध माणसे तासन् तास उभे राहातो, कोणी विचारत




नाही,असे एका ज्येष्ठ नागरिकाने सांगितले. या संपूर्ण परिस्थिवर प्रशासनाने डोळे झाकलेली असल्याची भावना लोकांमध्ये निर्माण झाली आहे. तहसील कार्यालयात दररोज शेकडो नागरिक विविध कामांसाठी येतात.

त्यामध्ये महिला, वृद्ध,दिव्यांग अशा विविध गटांतील लोकांचा समावेश असतो. तरीदेखील नागरिकांच्या सोयीसाठी आवश्यक असलेल्या सुविधा उपलब्ध करून देण्यात प्रशासन अपयशी ठरले आहे. सर्वत्र डिजिटल क्रांतीचा गजर असताना, तहसील कार्यालय मात्र मूलभूत सोयींअभावी मागे पडले आहे. ऑनलाईन सेवा आणि ई - गव्हर्नन्सच्या नावाखाली लाखो रुपये खर्च होत असताना, फक्त काही हजार रुपयांत सुटणाऱ्या पिण्याच्या पाण्याच्या सोयीसाठी व स्वच्छतागृहांच्या निर्मितीसाठी कोणी पुढाकार घेत नाही, हे दुर्दैवाचे आहे.

प्रशासनाकडून या बाबतीत केवळ कोरड्या घोषणा होत आहेत, प्रत्यक्षात कृती मात्र शुन्य आहे. नागरिकांच्या समस्या दिवसेंदिवस वाढत आहेत. तहसील कार्यालयाचा कारभार फक्त ऑनलाईन सुविधांवर चालवणे पुरेसे नाही, तर प्रत्यक्ष येणाऱ्या नागरिकांची देखील काळजी घेणे गरजेचे आहे. तहसील कार्यालयात येणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना योग्य सुविधा मिळाव्यात त्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यावर त्वरित उपाययोजना करण्याची मागणीही होत आहे.

# बच्चू कडू आक्रमक ! नागपूरमध्ये शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी आंदोलन

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२९, नागपूर :** शेतकऱ्यांच्या संपूर्ण कर्जमाफीसाठी राज्यभर मोठं जनआंदोलन उभं करण्याची घोषणा अपक्ष आमदार बच्चू कडू यांनी केली आहे. जूनच्या पहिल्या आठवड्यात साताऱ्याहून सुरू होणारी रॅली शेवटी नागपूरमध्ये मोठ्या सभेत रूपांतरित होणार आहे. यामध्ये शेतकरी, दिव्यांग, अपंग आणि कष्टकरी वर्ग मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

बच्चू कडू म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवडणुकीपूर्वी सातबारा कोरा करण्याचं आश्वासन दिलं होतं. मात्र ते आश्वासन अद्याप पूर्ण झालेलं नाही. त्यामुळेच हे आंदोलन उभं करत आहोत. चर्चा आणि बैठकींनी काहीच साध्य होत नाही, म्हणून आता निर्णायक लढा उभा करायचा आहे. या आंदोलनाची सुरुवात साताऱ्याहून होणार असून पहिली सभा बारामतीत, त्यानंतर ठाणे आणि इतर



शहरांमधून होत शेवटी नागपूरला मोठ्या जनसमुदायासह मोर्चा पोहोचणार आहे.

एक ते दीड लाख लोकांसह आम्ही नागपूरमध्ये अंतिम सभा घेणार आहोत. शेतकरी, दिव्यांग आणि अपंगांसोबत हा लढा आम्ही लढणार आहोत, असं बच्चू कडू यांनी ठणकावून सांगितलं. याशिवाय, १४ मे रोजी सर्व मंत्र्यांच्या घरासमोर रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. यावेळी आम्ही मंत्र्यांना सांगू की, रक्त घ्या, पण रक्त सांडण्याची वेळ येऊ देऊ नका. यामध्ये जनतेला जागरूक करण्याचा आणि सरकारवर दबाव टाकण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. बच्चू कडू यांनी अर्थभेदाचा मुद्दा उपस्थित करत सांगितले की, आता चर्चांनी काही होणार नाही यापूर्वी मी रायगडला उपोषणाला बसलो होतो. मुख्यमंत्र्यांसोबत बैठक झाली त्यानंतरही काही कारवाई होत नाही म्हणून या आंदोलन आम्ही करत आहोत. इथे अर्थभेद आहे, जाती आणि धर्मभेद पेक्षा अर्थभेद फार महत्त्वाचा आहे. आणि अर्थभेदामध्ये सर्व जाती धर्मांचे लोक कष्टकरी सर्वच आर्थिक विषमतेने पिचले जात आहेत. हे आम्हाला लोकांना समजवायचं आहे. म्हणूनच हे आंदोलन केवळ मागण्यांसाठी नाही, तर जनजागृतीसाठीही आहे, असे देखील बच्चू कडू यांनी म्हटले.

# अवैध गौण खनिज उत्खननावर नियंत्रण न ठेवल्याने तहसीलदार रणवरे निलंबित

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२९, पंढरपूर :** माढा तहसीलदार विनोद रणवरे यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीवर प्रतिबंधात्मक कारवाई तसेच गौण खनिज विषयक बाबींमध्ये करावयाची विहित मदतीतील कारवाई असमाधानकारक असल्याचे निर्देशनास आले होते. माढा तालुक्यातील उजनी धरण कार्य क्षेत्रात मोठ्या प्रमाणात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक सुरू असल्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाने १३ फेब्रुवारी २०२५ रोजीच्या पत्रा अन्वये संबंधितांची विभागीय चौकशी प्रस्तावित करून तहसीलदार माढा रणवरे यांच्या विरोध निलंबनाची कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त यांना सादर केलेला होता.

> माढा तालुक्यातील अवैध वाळू उपसा यावर नियंत्रण न ठेवणे व अन्य प्रशासकीय बाबीतील अनियमिततेमुळे माढा तहसीलदार विनोद रणवरे यांना निलंबित करण्याबाबतचा प्रस्ताव तीन महिन्यापूर्वी सनाला पाठवण्यात आलेला होता, त्या अनुषंगाने शासनाने दिनांक २३ एप्रिल २०२५ रोजी च्या आदेशान्वये माढा तहसीलदार श्री. रणवरे यांना निलंबित केलेले आहे. तरी यापुढे अवैध वाळू उपसा यावर नियंत्रण न ठेवणे तसेच कामात निष्काळजीपणा करणाऱ्या संबंधितावर अशीच कठोर कारवाई करण्यात येईल.
>
> **- कुमार आशीर्वाद जिल्हाधिकारी, सोलापूर**

याप्रकरणी शासनाच्या महसूल व वन विभागाने दिनांक २३ एप्रिल २०२५ च्या आदेशान्वये माढा तहसीलदार विनोद रणवरे यांनी कार्यालय प्रमुख या नात्याने कामकाजावर नियंत्रण ठेवले नसलेचे आणि कार्यालयीन तपासणीतील बाबींबाबत संधी देऊनही सुधारणा केली नाही.

तसेच अवैध गौण खनिज प्रकरणात योग्य प्रकारे कारवाई केलेली नसणे, खाणपट्टा मंजुरीच्या अनुषंगाने मागणी केलेला अहवाल दीर्घ मुदतीनंतर ही वरिष्ठ कार्यालयास सादर न करणे तसेच कार्यालयाच्या तपासणीनंतर शतकपूर्तीवेळी सदरच्या बाबी निदर्शनास आलेल्या असतानाही रणवरे यांनी कामकाजाकडे दुर्लक्ष करून गंभीर अनियमितता केल्यामुळे त्यांना शासनाने निलंबित केलेले आहे, अशी माहिती जिल्हा प्रशासनाच्या वतीने देण्यात आलेली आहे.

अक्षराज



# संपादकीय



## तुकडोजी महाराज

महाराष्ट्र भुमी ही विचारवंतांची, महामानवांची,क्रांतिकारकांची,थोर युगपुरुषांची आणि संतांची भुमी म्हणून ओळखली जाते.खरा भारत हा खेड्यांचा देश आहे आणि खेड्यांचा विकास झाला की देशाचा विकास व्हायला वेळ लागणार नाही असे ठणकावून सांगणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे महाराष्ट्रातील एक थोर विचारवंत आणि महान समाजसुधारक होते.त्यांचा जन्म ३० एप्रिल १९०९ रोजी अमरावती जिल्ह्यातील यावली या गावी झाला.त्यांचे पूर्ण नाव माणिक बंडोजी इंगळे असे होते.त्यांच्या आईचे नाव मंजुळाबाई होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे क्रांतीकारी विचारांचे संत आणि थोर समाजसुधारक होते. त्यांनी अनेक सामाजिक लढे लढून खेड्यांचा विकास कसा करायचा आणि समाजातील अंधश्रद्धा, अज्ञान व जातिभेदाचे निर्मुलन कसे करायचे हे नेहमी किर्तनातून स्पष्ट व सोप्या भाषेत सांगितले आहे. म्हणून त्यांनी लिहिलेला ग्रामगीता हा ग्रंथ मराठी भाषेतील सर्वोत्तम ग्रंथापैकी एक ग्रंथ आहे असे म्हटले तर काहीच वावगे ठरणार नाही. समाजातील अंधश्रद्धेचे निर्मूलन करण्यासाठी व जातिभेदाला समूळ नष्ट करण्यासाठी तुकडोजी महाराजांनी भजन,गायन व किर्तन या माध्यमांचा प्रभावी वापर केला. खंजिरी गायन प्रकाराच्या आधारे त्यांनी अनिष्ट रूढी परंपरा मोडीत काढण्याचा मूलमंत्र दिला आहे. १९३५ साली त्यांनी मोझरी या गुरुकुंज आश्रमाची स्थापना केली. महाराष्ट्रासह संपूर्ण भारतातून भ्रमण करून त्यांनी अध्यात्मिक, सामाजिक व राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला.जपान सारख्या देशात जाऊन त्यांनी धम्मपरिषदेत विश्वबंधुतेची शिकवण दिली.१९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांनी सहभाग घेतला होता व त्यांना काही काळ अटकही झाली होती. कुटुंबव्यवस्था,समाजव्यवस्था आणि राष्ट्रव्यवस्था या तीन महत्त्वाच्या व्यवस्थेत स्त्रियांची भुमिका अतिशय निकडीची आहे हे त्यांनी अनेकवेळा कीर्तनातून पटवून दिले आहे.त्यांची गाव खेड्यांविषयीची दूरदृष्टी अतिशय प्रभावी होती.खरा भारत हा खेड्यांत वसला आहे.आणि खेड्यांची दयनीय अवस्था त्यांना पहावत नव्हती.कीर्तनाच्या माध्यमातून समाजसुधारणा करताना त्यांनी काही काळ राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या सोबत समाज प्रबोधनाचे प्रभावी कार्य केले आहे.त्यांनी लिहिलेला ग्रामगीता हा ग्रंथ अतिशय दर्जेदार असून तो ग्रंथ प्रत्येक भारतीय व्यक्तीने वाचलाच पाहिजे असा अलौकिक ग्रंथ आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी लिहिलेल्या ग्रामगीता या पुस्तकात त्यांनी मानवी जीवन हे दुःखाने ओतप्रोत भरलेले आहे तरीपण दुःख नाहीसे करुन प्रत्येकाला सुखी जीवन मिळवण्यासाठी नेमके काय करता येईल याबद्दल समर्पक आणि अचूक मार्गदर्शन ओवींच्या रुपात शब्द बध्द केले आहे. ग्रामगितेत तुकडोजी महाराज यांनी अध्यात्मिक,सांस्कृतिक,धार्मिक, सामाजिक,शैक्षणिक,कृषी,ग्रामीण व शहरी मानवी जीवन अशा अनेक गोष्टींवर अगदी सडेतोड शब्दांत भाष्य केले आहे.देशाला एकसंघ ठेवण्यासाठी त्यांनी न्याय,समता व बंधुता ही मुल्ये प्रत्येक भारतीय नागरिकाने स्वीकारले पाहिजेत, जातीभेद नष्ट करण्यासाठी आणि अंधश्रद्धा हद्दपार करण्यासाठी त्यांनी ग्रामगितेत प्रभावी उपाय योजना सांगितली आहे.मानवी जीवनाशी निगडित सगळ्या समस्या आणि त्यावरील उपाय हे सांगताना तुकडोजी महाराज यांनी भारतातील महापुरुष,संत,महात्मे, विचारवंत यांची समतेची शिकवण अंगिकारण्याची शिकवण दिली आहे.

सध्या प्रत्येक गावात व्यसनी लोकांची संख्या वाढली आहे. त्यामुळे बऱ्याच घरचे कौटुंबिक वातावरण बिघडले आहे.समाजात व गावात अशांतता पसरली आहे.यावर भाष्य करताना तुकडोजी महाराज लिहितात...

**दारू,गांजा,भांग,अफिम**<br>
**जुगार,वेश्यादि वाईट काम**<br>
**यांचे उरू न द्यावे नाम**<br>
**आपुल्या गावी...**<br>
**त्यासाठी गावाच्या सज्जनांनी**<br>
**लागावे व्यसन निर्मुलनी**<br>
**उत्तम गुणांच्या अनेक श्रेणी**<br>
**वाढवाव्या गावी...**

अशाप्रकारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची ग्रामगीता आपल्याला मानवी जीवनाशी संबंधित अमूल्य संदेश देते.आणि विद्यार्थी जीवनात शालेय शिक्षण घेताना एका वर्गात मराठी विषयाच्या अभ्यासक्रमात समाविष्ट असलेली त्यांची कविता मला आजही जशीच्या तशी आठवते.

# मानवतेचे पुजारी : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

आपल्या देशातील सत्तर टक्के जनता ही खेड्यात राहते. भारताला खेड्यांचा देश म्हणून ओळखले जाते.आपल्या या कृषिप्रधान देशामध्ये खेड्यातील गरजा ह्या खेड्यातच भागाव्याच्या परंतु,लोकांच्या वाढत्या गरजा,अपेक्षा व नविन पिढीला शहरीजीवनाचे आकर्षण यामुळे खेडे ओस पडू लागली. ह्या सर्व घडामोडी लक्षात घेता,ग्रामविकास होणे गरजेचे आहे. ग्रामविकास झाला असता,राष्ट्राचा विकास होईल,कारण अजूनही बराचसा कच्चा माल हा खेड्यात शेतीतून पिकवल्या जातो,उत्पादित केल्या जातो व त्याला शहरी भागातील कारखाने व कंपनी मध्ये प्रक्रिया करून बाजारपेठ मध्ये विकल्या जातो. काही दशकापूर्वी या स्वरूपाची तुकडोजी महाराजांची विचारसरणी होती.तीच विचारसरणी या काळात ही तशीच लागू पडते.खेडे,गाव स्वयंपूर्ण कसे होईल, याविषयीची जी उपाययोजना तुकडोजी महाराजांनी सुचविली होती, ती अतिशय परिणामकारक ठरली.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामीण भागातील सर्व क्षेत्रातील वर्णन ग्रामगीतेच्या माध्यमातून केले आहे. ग्रामीण विकास हाच त्यांचा मुख्य केंद्रबिंदू होता.त्या काळातील ग्रामीण भागातील अज्ञानपना व शिक्षणाची स्थिती लक्षात घेता, शिक्षकांच्या हाती नविन पिढी घडवण्याची धुरा हाती असते म्हणून,शिक्षक कसे असावे? याविषयी सांगताना महाराज म्हणतात, गुरुजींनी ऐसे द्यावेत धडे । आपला आदर्श ठेवून पुढे । विद्यार्थी तयार होता चहुकडे । राष्ट्र होई तेजस्वी ।। राष्ट्राचा विकास साधायचा असेल तर,शिक्षकांनी विदयार्थ्यांना आत्मसन्मान,विकास,बुद्धीचातुर्याचे धडे,विज्ञानवादी व आत्मनिर्भरतेचे शिक्षण दिल्यास,आदर्श विद्यार्थी तयार होतील. तेच उद्याचे भविष्य घडवेल. त्यातून राष्ट्र विकास होण्यास मदत होईल.ग्रामीण स्तरावरील गृहस्था आश्रमाचे महत्त्व सांगताना तुकडोजी महाराज म्हणतात, आपुले घरची नवे घर । विश्व आपुले मकान सुंदर । हेचि शिकावया असे संसार । उद्धार तो याची मार्गे ।। तुकडोजी महाराज वरील ओवीच्या च्या माध्यमातून, जीवन जगण्याविषयींचा व्यापक दृष्टिकोन येथे सांगत आहे. आपले घर फक्त घर नाही तर संपूर्ण विश्व आपले घर असावे. अन हीच शिकवण ग्रहस्थाश्रमातून आपणास येते. तोच जगाचा उद्धार करण्यास मदत करेल.राष्ट्रसंत तुकडोजी महाराज खेड्यातील समाजसेवकांचा अर्थात तरुण मंडळी यांनी गावाचा विकास करण्यासाठी काय करायला हवे याचा दाखला देताना म्हणतात की, समाजसेवक कसा असावा? लाख बोलक्याहून थोर । एकची माझा कर्तबगार । हे वचन पाळूनी सुंदर । ग्राम सुधारावे कार्याने ।। ज्याप्रमाणे महात्मा ज्योतिबा फुले यांनी तत्कालीन परिस्थिती लक्षात घेता केवळ बोलू नाही तर, प्रत्यक्ष कृती करून समाजाची सेवा केली.जातीभेद,स्पृश्य-अस्पृश्यतेला फाटा देऊन, बोले तैसा चाले । त्याची वंदावी पाऊले ।। याप्रमाणे समाज कंटाकांचा प्रखर विरोध पत्करून गाव, खेडे सुधारण्यास पुढाकार घेतला. त्याचप्रमाणे गावातील कर्तबगार तरुण मंडळींनी समाज कार्यामध्ये, ग्राम विकासासाठी पुढाकार घ्यायला हवा.

आपले कार्य जर प्रमाणिक असेल तर परमेश्वर सुद्धा त्या ठिकाण मदतीला धावून येतो. याविषयीचा दाखला देताना राष्ट्र संत तुकडोजी महाराज म्हणतात, संत दामाजींनी सेवा केली । प्रसंगी धान्य कोठारे लुटविली । देवाने ही कदर केली । फेडले ऋण येऊनी ।। सेवेचे महत्त्व व जन माणसांविषयी तळमळ सांगताना महाराज म्हणतात,जेव्हा दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली होती. तेव्हा बादशहाच्या दरबारात कारकून म्हणून कार्य करणारे संत दामाजी यांनी धान्याची कोठारे सर्व गरीब जनतेस खुली करून दिली. तेव्हा अशा कार्याबद्दल त्यांना शिक्षेचा सुनावण्याची वेळ आली. तेव्हा प्रत्यक्ष परमेश्वर त्यांच्या मदतीसाठी धावून आला. व त्याचे ऋण फेडले. थोडक्यात हेच की आपल्या हृदयामध्ये निर्मळ समाज सेवेचे व्रत धारण करायला हवे. परमेश्वर त्या ठिकाणी नक्कीच मदत करतो.

ग्रामरक्षण करण्यासाठी गावातील तरुणांना उपदेश करतांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज संत तुकोबाराय व छत्रपती शिवाजी राजे यांचा दाखला देतात. आपुले वारकरी भाविक । तेची वार कर्ते पाईक । करुनी दृष्टांशी लाविला धाक । शिवाजीच जणू सर्वही ।। ग्रामरक्षणासाठी तरुणांनी एकत्रित यावे याविषयी संत तुकोबा जसे, भक्ती बरोबर शक्तीचे महत्त्व सांगून तरुणांना स्वराज्यासाठी प्रेरित करायचे. त्याचप्रमाणे या काळातही तरुणांनी ग्रामाचे रक्षण व विकास करण्यासाठी एकत्रित यावं. अध्यात्माबरोबर गावाचे रक्षणकर्ते होऊन जो, ग्राम विकासाच्या आड येईल त्याला धडा शिकवावा असा तरुणांना संदेश देताना महाराज म्हणतात,प्रत्येक तरुण हा छत्रपती शिवाजी राजांसारखा राष्ट्रासाठी झटावा व स्वराज्याबरोबर सुराज्य निर्माण करावं.



स्वच्छतेचे महत्व सांगताना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात,रामधुनपूर्वी गाव पूर्ण । व्हावे स्वच्छ सौंदर्यवान । कोणाही घरी गलिच्छपण । न दिसावे ।। राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात, ज्याप्रमाणे संत गाडगेबाबा गावोगावी जाऊन सूर्योदयापूर्वी सर्व गाव हातातील झाडूने स्वच्छ करायचे व संध्याकाळी समाज प्रबोधनपर कीर्तनाच्या माध्यमातून तेथील लोकांच्या डोक्यातील जातीप्रथा, स्पृश्य-अस्पृश्यता व अंधश्रद्धेची घाण साफ करायचे.कीर्तन आटोपून तेवढ्याच रात्री शेजारच्या गावी पायी जायाचे त्याचप्रमाणे ग्रामातील सर्व लोकांनी सूर्योदयापूर्वी उठून आपल्या अवतीभवतीचे अर्थात घर व घरासमोरील जागा स्वच्छ करावी. सुंदर, स्वच्छ व सौंदर्यावान असा गाव व परिसर बनवावा.कोणाच्याही घरी गलिच्छ वातावरण दिसायला नको. त्यामुळे रोगराई पसरणार नाही. ग्रामातील प्रत्येकाचं आरोग्य चांगले राहील.खेड्यापाड्यात पूर्वी अनलुतेदार व बलुतेदारी पद्धती होती. हे अठरा अलुतेदार व बारा बलुतेदार एकमेकांच्या गरजा भागवायचे. म्हणून संत तुकडोजी महाराज म्हणतात, हाती उद्योगाचे साधन । मुखी राम नामाचे चिंतन । हाची धर्म आहे महान । गावकरी लोकांचा ।। तुकडोजी महाराज म्हणतात प्रत्येक व्यक्तीने काहीतरी छोटा-मोठा उद्योग करायला हवा. त्यामुळे रोजगार उपलब्ध होईल.त्यातून अर्थोत्पादन तर होईलच, मात्र त्याबरोबर वेगवेगळ्या उद्योगातून एकमेकांच्या गरजा भागतील. हे कार्य करताना सदा परमेश्वराचे नाम मुखात असावे.हाच खरा धर्म आहे.

स्त्री-पुरुष समानतेचे महत्त्व सांगताना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात,स्त्री पुरुष ही दोन चाके । जरी परस्पर सहाय्यके । तरीच संसार रथ चाले कौतुके । ग्राम होई आदर्श ।। वरील ओवी मध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात,स्त्री व पुरुष संपूर्ण विश्वातील संसार रथांचे दोन चाके आहेत. ज्याप्रमाणे एखादा रथ हा एका चाकांनी चालत नाही.ते दोन्ही चाके एकमेकांना सोबत घेऊन रथ हाकलण्यास मदत करतात. त्याचप्रमाणे स्त्री-पुरुष हे परस्परास सहाय्यक आहे. एकमेकांवाचून अपूर्ण आहे.या संसाराची रुपी रथाची चाके अर्थात संपूर्ण विश्वातील सर्व घडामोडी जर सुरळीत चालवायचे असतील तर,स्त्री व पुरुष यांनी सोबत खांद्याला खांदा लावून कार्य करायला हवे. तेव्हाच हा संसाररथ आनंदाने धावत राहील व त्यातून ग्रामच नाहीतर,विश्वाचेही कल्याण होईल.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी मराठीप्रमाणेच हिंदी भाषेतही विपुल लेखन केले.त्यांचे साहित्य आजही आपल्याला मार्गदर्शन करीत आहे. राष्ट्रभक्तीपर गीत लिखाणाबरोबर महाराज खंजिरी वादन सुद्धा करून भजन म्हणायचे. राष्ट्रपतिभवनात झालेले त्यांचे खंजिरी भजन ऐकून तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी तुकडोजी महाराजांना राष्ट्रसंतम्हणून संबोधले होते. महाराजांच्या ग्रामविकास तथा समजप्रबोधनपर विचारांच्या प्रसिद्धीचे कार्य अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाद्वारेआजही अविरत चालू आहे. .

अशाप्रकारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्राम स्तरावरील सर्व घडामोडीचे यथार्थ वर्णन ग्रामगीतेत केले आहे.ग्रामगीतेतून महाराजांनी ग्राम विकास साधण्यासाठी शिक्षण,स्वच्छता, आरोग्य,स्त्री-पुरुष समानता, शेती व उद्योगधंदे,परमेश्वर भक्ती,सर्वधर्मसमभाव,यातून जनमानसात शांती टिकून राहिल. यातून आजही खेडे समृद्ध व स्वयंपूर्ण होण्यास मदत होईल. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे मानवतेची पुजारी होते.त्यांच्या समग्र जीवन कार्यातून समस्त मानव जातीचे कल्याण व राष्ट्रभक्तीचे दर्शन दर्शन घडते.

**वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज**<br>
**यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन...!**

**श्री.विनोद शेनफड जाधव**<br>
**मासरूळ जि.बुलडाणा**<br>
**मो.नं.९७६३२८२०७७**

## अक्षय तृतीया..

मुहूर्त शुभ साडेतीन<br>
अक्षय त्रितीयेचा सण<br>
जपा जरा प्रकृतीला<br>
उन्हं सुरू ते रणरण

महाभारत ग्रंथलेखन<br>
व्यास वदे श्रीगजानन<br>
त्रेता युग झाले सुरू<br>
कृत युग आज संपून

महाभारत युध्द सरे<br>
कौरव जाय यमसदन<br>
युध्द कधी नसे भले<br>
रडून सांगते रणांगण

महात्मा श्री बसवेश्वर<br>
परशुराम जन्म दिन<br>
अन्नपूर्णेला शत नमन<br>
आज करूया अन्नदान

बाके बिहारी मंदिरात<br>
श्रीविग्रहाचे दिसेचरण<br>
तन मन शुध्दी करण<br>
आज करावे गंगास्नान

कृषी संस्कृती पालक<br>
करा बळीराम पूजन<br>
आखाजी होई साजरी<br>
सुखे करा बीजरोपण

आज उदक कुंभ दान<br>
करावे मृत्तिका पूजन<br>
एक तरी वृक्ष लावा<br>
फुलेले अक्षय वृंदावन

**- हेमंत मुसरीफ पुणे**<br>
**९७३०३०६९९६**

# सामाजिक क्रांतीचे जनक : महात्मा बसवेश्वर



सामाजिक क्रांतीचे जनक महात्मा बसवेश्वर यांची आज जयंती. दरवर्षी अक्षय तृतीयेला महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी केली जाते. महात्मा बसवेश्वर यांचा जन्म ११०५ मध्ये झाला. महात्मा बसवेश्वर हे बिज्जल राज्याच्या दरबारात महामंत्री होते. महात्मा बसवेश्वर यांना सामाजिक क्रांतीचे जनक असे म्हणतात कारण त्यांनी प्रचलित सनातनी धर्मातील कर्मकांड, अंधश्रद्धा, जातीव्यवस्था, स्त्री-पुरुष, उच्चनीच, श्रेष्ठ-कनिष्ठ भेदभाव यासारख्या कुप्रथांच्या विरोधात बंड पुकारले. हे बंड म्हणजे माणसाला माणूस म्हणून जगण्याचा हक्क नाकारणाऱ्या संस्कृती विरुद्ध पुकारलेला एल्गार होता. या बंडात सामाजिक क्रांतीची बीजे पेरली गेली होती. बाराव्या शतकात भारताचे समाज जीवन अंधकारमय झाले होते. समाजात अंधश्रद्धा, कर्मकांड, भेदभाव वाढत चालला होता. बहुदेवता उपासना, पुरोहित वर्गाची मक्तेदारी, पाप पुण्याची दहशत, उच्च-नीच, श्रेष्ठ-कनिष्ठ, स्त्री- पुरुष भेदभाव इत्यादींनी भारतीय समाजमन बेजार झाले होते. अशा वेळी भारतीय समाजमन जागृत करुन माणसाला माणूसपण मिळवून देण्याचे काम महात्मा बसवेश्वर यांनी केले. त्यासाठी त्यांना तत्कालीन समाजसत्तेशी, राज सत्तेशी मोठा संघर्ष करावा लागला. माणूस हा जन्माने नव्हे तर कर्माने मोठा होतो अशी त्यांची धारणा होती म्हणूनच तत्कालीन व्यवस्था बदलून नवी समाजव्यवस्था त्यांचे निर्माण केली. जिथे उच्च-नीच, श्रेष्ठ-कनिष्ठ, स्त्री-पुरुष, जात-पात असा कुठलाही भेदभाव नाही, विषमता नाही. कर्मकांड, अंधश्रद्धा नाही अशी समाजव्यवस्था महात्मा बसवेश्वर यांनी आपल्या अलौकिक विचारधारेतून आणून दाखवली म्हणूनच त्यांना दक्षिणेतील गौतम बुद्ध असे म्हणतात. प्रत्येकाने कर्म करूनच जगले पाहिजे. जन्माच्या आधारे भेदभाव नाही. या त्यांच्या या विचारांची अंमलबजावणी पुढे डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात केली. जगातील पहिली संसद असे ज्याचे वर्णन केले जाते ती अनुभव मंटप नावाची परंपरा त्यांनी सुरू केली. अनुभव मंटप हे असे सार्वजनिक ठिकाण होते जिथे सर्व समाज घटकांतील स्त्री पुरुष एकत्र बसून आपआपले अनुभव सांगत आणि त्यातून समाज म्हणून एकत्रितपणे पुढे जाण्याचे नियम ठरत. महात्मा बसवेश्वरांचे एक वचन आहे. कायकवे कैलास कैलास म्हणजे मोक्ष, म्हणजे काम केल्यानेच मोक्ष मिळतो. मोक्ष मिळवण्यासाठी कुठल्याही कर्मकांडाची गरज नाही. महात्मा बसवेश्वरांनी आपल्या सहकार्याच्या मुलगा आणि मुलीच्या विवाहास समर्थन दिले जो आंतरजातीय विवाह होता. मुलगा हा चांभार समाजाचा तर मुलगी ब्राह्मण समाजाची होती. महात्मा बसवेश्वरांच्या या सुधारणावादी, समतावादी कार्याने खवळलेल्या सनातन्यांनी या घटनेचे भांडवल करून लोकांना भडकवले आणि दुसऱ्या बाजुला राजा बिज्जलचा खून करुन त्याचा आळ महात्मा बसवेश्वरांवर आणला. सहकाऱ्यांच्या आग्रहास्तव महात्मा बसवेश्वर जीव वाचवण्यासाठी तेथून पळाले पण सनातन्यांनी अनेक शरण, शरणार्थ्यांची हत्या केली. त्यांनतर महात्मा बसवेश्वरांनी पुन्हा समतावादी लिंगायत धर्माची परंपरा वाढवण्याचा प्रयत्न केला. महात्मा बसवेश्वर यांचे समतावादी, सुधारणावादी विचार आपल्या जीवनात आचरणे हे प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे. जयंतीदिनी महात्मा बसवेश्वर यांना विनम्र अभिवादन!

**- श्याम बसप्पा ठाणेदार**<br>
**दौंड जिल्हा पुणे**<br>
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

# केंद्र सरकारच्या योजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करा- ना.प्रतापराव जाधव

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२९, बुलडाणा :** केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी योजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देश केंद्रीय राज्यमंत्री तथा 'दिशा' समितीचे अध्यक्ष ना. प्रतापराव जाधव यांनी मंगळवार, दिनांक २९ एप्रिल २०२५ रोजी विभाग प्रमुखांना दिले. बुलडाणा जिल्ह्यातील केंद्रीय योजनांच्या प्रगती आढावा घेण्यासाठी दिनांक २९ एप्रिल २०२५ रोजी जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण अर्थात 'दिशा' समितीची बैठक जिल्हा नियोजन समिती सभागृहात पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय राज्यमंत्री तथा खासदार ना. प्रतापराव जाधव हे होते. या बैठकीला जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, पोलीस अधीक्षक विश्व पानसरे, प्रकल्प अधिकारी राजेश इंगळे यांच्यासह उपविभागीय अधिकारी, विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.




बैठकीच्या सुरुवातीला जम्मू व काश्मीर मधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील मृतकांना मौन बाळगून श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर ना. प्रतापराव जाधव यांनी जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पाचा आढावा घेतला. यावेळी सिंचन प्रकल्पबाधीतांच्या पुनर्वसन आणि भूसंपादन प्रक्रियेची माहिती घेतली. यात भूसंपादन प्रक्रियेबद्दल लोकांच्या तक्रारींचे निराकरण करावे. प्रकल्पबाधितांना योग्य मोबदला मिळाला पाहिजेत. बुडीत क्षेत्रातील बाधीतांचे ज्या ठिकाणी पुनर्वसन केले जात आहे. त्या ठिकाणी रस्ते, पाणी, वीज आदी पायाभूत सुविधा असाव्यात. जागा हस्तांतरणाचे प्रस्ताव निकाली काढावे. यासह जिगांव सिंचन प्रकल्पातील उपलब्ध पाण्याचे नियोजन करावे. पुनर्वसन गावांना प्रत्यक्ष भेटी देवून पाहणी करण्याचे निर्देश ना. प्रतापराव जाधव यांनी अधिकाऱ्यांना दिले. यावेळी ना. प्रतापराव जाधव यांनी प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा आढावा घेतला.

२०२३-२४ वर्षात खरीप आणि रब्बी हंगामांतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील सुमारे ४ लाख ५० हजार शेतकऱ्यांना ४५३ कोटी रुपये रक्कमेचा पीक विमा मंजूर झाला होता. त्यातील ४२९ कोटी रुपये वितरित करण्यात आले असून उर्वरीत २४ कोटी रुपये शेतकऱ्यांचे खाते आधार लिंक व इतर कारणांमुळे जमा झाले नव्हते ती नुकसान भरपाई देखील शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होत आहे. या शिवाय सन २०२४-२५ च्या खरीप हंगामात १४४ कोटी रुपये पीक विम्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाली असून उर्वरीत शेतकऱ्यांच्या खात्यात पीक पैसे जमा होणार आहेत. असल्याची माहिती कृषि विभागाने दिली. त्याबाबत ई-केवायसी अभावी या योजनेचा लाभ न मिळालेल्या शेतकऱ्यांना संपर्क करावे. प्रशासनाने शेतकऱ्यांना पीक विमा योजना समजावून सांगाव्या. यासोबत, गावनिहाय भेटी देवून कृषी योजनांची माहिती व त्याचा लाभ शेतकऱ्यापर्यंत पोहोचवा. प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेत ई-केवायसी करतांना येणाऱ्या अडचणी सोडवा. अडचणी असलेल्या शेतकऱ्यांना योग्य माग्रदर्शन करा त्यांचे प्रश्न सोडवा, असे निर्देश केंद्रीय राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव यांनी दिले.

**शेतरस्ते, पाणंद रस्त्यांसाठी कृती आराखडा तयार करा**

ग्रामीण भागातील शेतरस्ते, पाणंद रस्त्यासाठी कृती आराखडा तयार करावा. या आराखड्यात शेतकऱ्यांच्या मागण्यांचा समावेश करण्याच्या सूचना बीडीओंनी प्रत्येक ग्रामसेवकाला द्याव्यात, असे निर्देशही ना. जाधव यांनी दिले.या बैठकीत ना. प्रतापराव जाधव यांनी प्रधानमंत्री सुर्यघर योजना, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना, मनरेगा, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, १५ वा केंद्रीय वित्त आयोग, गृहनिर्माण योजना, जलजीवन मिशन, अटल भूजल योजना, मजीप्रा, पाणी टंचाई निवारनार्थ उपयोजना, स्वच्छ भारत मिशन, राष्ट्रीय आरोग्य योजना, प्रधानमंत्री जनआरोग्य योजना, प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना, कौशल्य विकास योजना, पीएम श्री शाळा, डिजिटल इंडिया, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, राष्ट्रीय महामार्ग, रेल्वे प्रकल्प, नगरपरिषदेच्या योजना, नवीन शैक्षणिक प्रकल्पांचा सविस्तर आढावा घेतला.

## महाराष्ट्रातील सुरक्षारक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षारक्षकांना खाकी वर्दी वापरण्यास १ मे पासून परवानगी



**अक्षराज : आदिनाथ देशमुख**

**दि.२९, नवी मुंबई :** नवी मुंबई सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा सुरक्षारक्षकांच्या गणवेशाचा रंग खाकी करण्याबाबत विविध संघटना कडून व सुरक्षारक्षक कडून शासन स्तरावर मागणी करण्यात आली होती. त्यानुसार शासनाने दिनांक ०१ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या पत्रानुसार मंडळातील नोंदीत सुरक्षा कर्मचारी यांचा गणवेशाचा रंग खाकी तसेच टोपीचा रंग निळा व त्यावर सुरक्षारक्षक मंडळाचा लोगो व नाव चिन्हांकित करण्यास मान्यता देण्यात आली होती. सदर मान्यतेनुसार दिनांक २९ एप्रिल २०२५ रोजी कामगार मंत्री आकाश फुडकर यांनी मंडळाच्या नोंदीत सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या खाकी रंगाच्या गणवेशाचे अनावरण करून ०१ मे कामगार दिनाचे औचित्य साधून सुरक्षारक्षक मंडळातील पूर्ण महाराष्ट्रातील नोंदीत सुरक्षा रक्षकांना गुरुवार, दिनांक ०१ मे २०२५ रोजी पासून खाकी रंगाचा गणवेश परिधान करण्यासाठी शुभारंभ करण्यात येत असल्याचे जाहीर केले आहे.

त्या प्रसंगी कामगार आयुक्त एस.पी.तुमोड, सहा.आयुक्त लोखंडे सुरक्षा रक्षक मंडळाचे चेअरमन अशोक डोके, सचिव गौरव नालींदे उपस्थित होते. तसेच महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक जनरल कामगार युनियनचे संस्थापक, अध्यक्ष लक्ष्मणराव भोसले यांनी खाकी वर्दी सुरक्षा रक्षकांना मिळावी. यासाठी खूप प्रयत्न केले. तसेच सुरक्षारक्षक मंडळातील संघटनेचे प्रतिनिधी, पदाधिकारी उपस्थित होते.

## नवी मुंबईत उन्हाळी सुट्टीतील बालनाट्य शिबिर




**अक्षराज : आदिनाथ देशमुख**

**दि.२९, नवी मुंबई :** उन्हाळी सुट्टीतील बालनाट्य शिबिर नवी मुंबई बालरंगभूमी आणि संत शिरोमणी कला मंच नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ०२ मे १२ मे २०२५ रोज या कालावधीमध्ये बालनाट्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. विष्णुदास भावे नाट्यगृह वाशी तालीम हॉल येथे दररोज सायंकाळी ५ ते ७ वेळेत होणार आहे. नवकलाकारांच्या सुप्त कला गुणांना योग्य संधी मिळावी. त्यातून चांगले कलाकार घडावे चांगले नाट्यरसिक घडावे. या उद्देशाने गेले २८ वर्षे ज्येष्ठ रंगकर्मी श्रीहरी पवळे शिबिराचे आयोजन करीत आहे. जे विद्यार्थी मागील शिबिरात सहभागी झाले होते. त्यांना सदर शिबिर विनामूल्य असणार आहे. ज्या पालकांना आपल्या पाल्याला या शिबिरामध्ये सहभागी करून घ्यायची असेल त्यांनी संपर्क करावा. या शिबिरासाठी श्रीहरी पवळे मार्गदर्शन करणार आहेत. या शिबिरामध्ये बालनाट्य संकल्पना, बाल नाट्य अभिनयाची ओळख, अभिनयाचे प्रकार, समाधीठपणा, निरीक्षण व कल्पनाशक्तीचा विकास सूत्रसंचालन, निवेदन, संवाद फेक नृत्य संस्कार अशा विविध विषयावर प्रात्यक्षिक होणार आहे. अखेरच्या दिवशी बाल नाट्य सादरीकरण होईल शिबिरामध्ये मर्यादित प्रवेश असून वय वर्ष सहाच्या पुढे बालकलाकारांना या शिबिरामध्ये प्रवेश दिला जाणार आहे. या शिबिरामध्ये सहभागी होण्यासाठी ९३२२५०४३१४ श्रीहरी पवळे यांच्याशी संपर्क साधावा.

## तुळजाभवानी मंदिराच्याविकास आराखड्यामध्ये पुजारी, व्यापारी यांच्या सुचना ग्राहय धराव्यात- खा. राजेनिंबाळकर

**अक्षराज : विकास वाघ**

**दि.२८, धाराशिव :** जिल्हाधिकारी कार्यालय,धाराशिव येथे आई तुळजाभवानी मातेच्या मंदीर प्रस्तावित विकास आराखड्याच्या संदर्भात महत्त्वपूर्ण आढावा बैठक झाली. या बैठकीस माझ्यासह आमदार कैलास पाटील,जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार,तसेच मंदिर परिसरातील पुजारी, व्यापारी व नागरिक उपस्थित होते. आई भवानीच्या भक्तीने प्रेरित होऊन,तुळजापूरच्या परंपरांचा आदर राखत आणि भविष्यासाठी मजबूत पायाभरणी करत खालील महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. मंदिराची पवित्र वास्तू व मूळ स्वरूप अखंड राखले जाईल. कोणताही अनावश्यक बदल न करता विकास आराखडा राबवला जाईल. पारंपरिक पूजा-पद्धती व कालाचार कायम राहतील. श्रद्धेचा गाभा अबाधित राहील. सेवेकऱ्यांना सेवा सुरक्षित ट्रस्टमार्फत मानधन तत्वावर सेवेची सलगता राखली जाईल.

व्यापाऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण! १९८८ मध्ये भूसंपादित रस्त्यावरील व्यापाऱ्यांना मावेजा तत्काळ दिला जाईल. व्यवस्थीत पुनर्वसन व सुविधा: विस्थापित व्यापाऱ्यांचे समर्पक पुनर्वसन सुनिश्चित करण्यात येईल. पुजारी व व्यापारी बांधवांचे हित सर्वोच्च: मूळ बाजारपेठ,व्यापारी व पुजारी यांचे विस्थापन टाळले जाईल. आई भवानीच्या मूळ मूर्तीचे महत्त्व जपले जाईल.

१०८ फूट उंच भवानीमातेची भव्य मूर्ती: रामदरा तलाव परिसरात मूळ रचनेचा आदर राखून उभारण्यात येईल. भाविकांसाठी सुलभ दर्शनव्यवस्था: भक्तांचा




सन्मान राखत सहज आणि समाधानकारक दर्शनासाठी प्रयत्न केले जातील. तुळजापूरची स्वच्छता व सौंदर्य वाढवण्यासाठी विशेष मोहिमा राबवण्यात येतील.आई भवानीच्या भक्तीचा गजर अखंड राहावा,परंपरा अभंग राहाव्यात आणि सर्व स्तरातील नागरिकांचे हित जपले जावे या ध्येयाने आम्ही कटिबद्ध आहोत! तुळजापूरचा विकास म्हणजे आपल्या श्रद्धेचा विजय आहे.

## महाराष्ट्र गौरव मंगल कलश रथ यात्रेचे पारनेर शहरात उद्या आगमन रथयात्रेचे स्वागतासाठी आ.दाते यांची उपस्थिती



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२९, सुपा (अहिल्यानगर) :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने राज्यात महाराष्ट्र गौरव मंगल कलश रथयात्रेचे आयोजन करण्यात आले असून ही मंगल कलश रथयात्रेचे पारनेर शहरात मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात येणार असून शहरातील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय येथे सभेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आमदार काशिनाथ दाते यांनी दिली आहे. दिनांक ०१ मे २०२५ रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने ६५ व्या महाराष्ट्र दिनानिमित्त गौरवशाली महाराष्ट्र महोत्सवाचे मुंबई येथे आयोजन करण्यात आले आहे. आपल्या महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाचा सामाजिक समतेचा आणि एकात्मतेचा संदेश देणारी ही मंगल कलश रथ यात्रा राज्यभर सुरू आहे. या मंगल कलश यामध्ये गड किल्ले ऐतिहासिक वास्तूंची माती नद्यांचे पाणी एकत्र करण्यात येणार आले आहे. धार्मिक उत्सवाबरोबर भक्तीच्या संगमातून संस्कृतीचा सन्मान करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने या मंगल कलशरथ यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या मंगल कलश रथयात्रेचे स्वागत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आमदार काशिनाथ दाते यांनी केले आहे.

## महाबळेश्वर नगरपालिकेच्या माध्यमातून महापर्यटन मोहत्सवाची जय्यत तयारी




**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.२९, महाबळेश्वर (सातारा) :** जागतीक दर्जाचे सुप्रसिद्ध पर्यटन स्थळ महाबळेश्वर येथे दिनांक ०२ मे ते ४ मे २०२५ पर्यंत होणाऱ्या महापर्यटन मोहत्सवाची तयारी अंतीम टप्प्यात आली आहे. महाबळेश्वर शहर ते वेण्णा लेक रस्त्यालगत बंद अवस्थेत असलेले व नादुरुस्त पथदिवे दुरुस्त करण्यात येत आहेत. वेण्णा लेक ते महाबळेश्वर या मुख्य रहदारीच्या रस्त्यालगत असलेले पथ दिवे नादुरूस्त होते. त्यांचे दुरुस्तीचे काम युद्ध पातळीवर रात्रीचे वेळीस स्काय लिफ्टच्या साह्याने वेगाने सुरू असून सदरील पथदिवे दुरुस्तीचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. प्रशासक तथा मुख्याधिकारी योगेश पाटील कर्मचाऱ्यांच्या समवेत फील्डवर स्वतः जातीने उपस्थित राहून शहर व परिसरातील कामांचा आढावा घेत आहेत. त्याच प्रमाणे वेण्णा लेक येथे आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली असून आकर्षक असा विद्युत नामफलक लावण्यात आला आहे. वेण्णा लेक परिसराचे आर्कषक सुंदर असे सुशोभिकरण मुख्याधिकारी योगेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपालिकेच्या माध्यमातून करण्यात येत असून अनेक ठिकाणची विकास कामे पुर्ण करण्यात आली आहेत. महाबळेश्वर नगरी महापर्यटन मोहत्सवाकरिता व पर्यटकांच्या स्वागताकरिता सज्ज झाली आहे.

## रेल्वे स्टेशन वरील चहा विक्रेत्यांवर वैधमापन शास्त्र विभागाची कारवाई

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२९, नवी मुंबई :** कोकण विभागाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या रेल्वे स्थानकावरील स्टॉलवर चहा, खाद्यपदार्थ व इतर वस्तूंची विक्री होत असते. सहनियंत्रक, वैधमापन शास्त्र कोकण विभागाचे शिवाजी काकडे, यांच्या सूचनेवरून नुकतीच कारवाई करण्यात आली. ठाणे जिल्ह्यातील कल्याण व ठाणे, पालघर जिल्ह्यातील वसई, रायगड जिल्ह्यातील पनवेल व कर्जत, रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण व रत्नागिरी, सिंधुदूर्ग जिल्ह्यातील कुडाळ या रेल्वे स्टेशनवर संबंधित जिल्हा उपनियंत्रकांच्या मार्गदर्शनाखाली चहा, खाद्यपदार्थ व इतर वस्तूंची विक्री करणाऱ्या आस्थापनांवर अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या वैधमापन शास्त्र यंत्रणेतील निरीक्षकांनी अचानक भेटी देऊन वैधमापन शास्त्र अधिनियम २००९ मधील तरतूदीन्वये तपासणी केली. रेल्वे स्टेशनवरील चहा विक्री करणाऱ्या आस्थापनांना १५०/१८० मिली एवढे घोषित प्रमाण असताना तपासणीमध्ये ३० ते ८० मिली एवढा चहा एव्हढा चहा कमी देत असल्याचे आढळून आले. अश्या एकूण ७ आस्थापनांवर वैधमापन शास्त्र अधिनियम २००९ मधील तरतूदीन्वये प्रकरण दाखल करण्यात आले. वापरात असलेली तोलन उपकरणे विहित मुदतीत फेर पडताळणी व मुद्रांकन करून न घेतल्यामुळे ०४ प्रकरणे दाखल करण्यात आली. चिपळूण व रत्नागिरी स्टेशन वरील आस्थापनेवर विक्रीसाठी ठेवण्यात आलेल्या आवेष्टित वस्तू वर नियमातील तरतुदींअन्वये आवेष्टनावर घोषवाक्य नमूद न केल्यामूळे प्रकरण दाखल करण्यात आले आहे.अशी माहिती पत्रकान्वये कोकण विभागाचे सह नियंत्रक, वैध मापन शास्त्राचे शिवाजी काकडे यांनी दिली.

## समाज मंदिरासमोर, ध्वजारोहनाचा झेंडा लावण्यास विरोध

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२९, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील अपधुप गावात पंचशिल मित्र मंडळाच्या वतीने दि.१२ मे २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व बुध्द जयंती आयोजीत केली आहे. त्या निमित्ताने गावातील समाज मंदीरासमोर ध्वजा रोहनाचा झेंडा लावत असतांना गावातील काही जातीयवादी लोकांनी विरोध दर्शवला आहे. गावातील समाज मंदीर हे सर्व जाती धर्माच्या लोकांच्या सार्वजनिक कार्यक्रमासाठी उभारलेले असते. ती जागा ही सार्वजनीक ठिकाण म्हणून संबोधले जाते. त्या ठिकाणी दरवर्षी प्रमाणे पंचशिल मित्र मंडळ हे छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व बौद्ध जयंती आयोजीत केलेली आहे. त्या निमित्ताने तेथील समाज मंदिराजवळ ध्वजारोहणाचा झेंडा लावण्यासाठी गेलेल्या मंडळाच्या कार्यकर्त्यांना स्थानिक महिला-पुरुष जातीयवादी मंडळीनी विरोध केला. समाजात एक प्रकारची तेढ निर्माण करुन बौध्द समाजावर एक प्रकारचा अन्याय होत असताना जानवतो. पंचशिल मित्र मंडळाच्या वतीने संबधित सुपा पोलिस स्टेशनला तसे तक्रारी निवेदन देऊन जिल्हाधिकारी, तहसीलदार, पोलिस अधिक्षक यांना ही लेखी निवेदन देऊन आम्हा बौद्ध वर्गावर होत असलेला अन्यायाला कुठेतरी न्याय मिळाला पाहीजे असे ही निवेदनात म्हटले आहे.

# पारनेर तालुका खरेदी विक्री संघाच्या अध्यक्षपदी रोकडे बिनविरोध

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२९, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्याच्या संमिश्र राजकारणात डॉ,सुजय विखे पाटील याचं वर्चस्व कायम!त्याच अनुसंगाने पारनेर तालुक्याचं विकासाचं पर्व नव्या जोमाने परत काम करीत असतांना दिसतं ही वस्तुस्थिती पहावयास मिळते. पारनेर तालुका खरेदी विक्री संघाच्या अध्यक्ष, उपध्याक्ष पदाच्या निवडीसाठी २९ एप्रिल रोजी सभा पार पडली.

राजकीय, समिकरण पहाता महत्वाच्या संस्थेच्या अध्यक्षपदी जयराम रोकडे तर उपाध्यक्षपदी प्रसाद शितोळे यांची बिनविरोध निवड झाली. खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार काशिनाथ दाते, भाजपचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे पाटील, सुजीत झावरे, विश्वनाथ कोरडे यांच्या संगठन कौशल्याने, एकमताने ही निवड प्रक्रिया बिनविरोध करण्यात आली. वरीष्टांच्या आदेशाने बाबासाहेब खिलारी, गंगाधर रोहकले यांनी राजीनामा दिल्याने अनेक संचालक, अध्यक्ष पदासाठी मोट बांधुन होते. परंतु सर्वांना विश्वासात घेऊन ही निवडणूक प्रक्रिया बिनविरोध पार पडली. भाजप आणि राष्ट्रवादी यांचे



संगनमताने एकहाती सत्ता असल्याने भविष्यात सहकारी क्षेत्रात नवी दिशा मिळण्याची शक्यता आहे. नविन पदाधिकार्यांचा सत्कार व सन्मान करण्यात आला.

त्यावेळी भाजपचे राहुल शिंदे, सुनिल थोरात, दत्ता नाना पवार, पंकज कारखिले, शिवाजी रोकडे, दादाभाऊ वारे, लहु भालेकर, रेखा मते, ज्योती ठुबे, संतोष पिंपरकर, मधुकर पठारे, संग्राम पावडे,बाबासाहेब खिलारी, गंगाधर रोहकले, प्रमोद कावरे, भाऊसाहेब मेचे, शैलेंद्र औटी, भरत गट, सिताराम देठे, लहु रावडे, संदीप ठुबे, अनिल दिवटे कारभारी गायकवाड, संजय मते, संतोष आवारी, शशी कारखिले, बाजीराव अलभर अदी तालुक्यातील समुदाय मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# जागरूक नागरिकांमुळे डोंबिवलीत जबरी चोरी करणारे दोन आरोपी रंगेहात पकडले

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२९, डोंबिवली (ठाणे) :** जागरूक नागरिकांच्या सतर्कतेमुळे आणि डोंबिवली पोलिसांच्या वेळीच हस्तक्षेपामुळे एसबीआय बँकेसमोर, टिळकरोड येथे घडलेली जबरी चोरीची घटना उधळवण्यात आली. रात्री १०:१५ वाजण्याच्या सुमारास दोन अनोळखी इसम एका व्यक्तीला मारहाण करून त्याच्याकडील रोकड चोरताना दिसल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना मिळताच, त्यांनी तत्काळ रात्रगस्तीचे अधिकारी, बिट अंमलदार आणि गुन्हे प्रकटीकरण पथकाला घटनास्थळी रवाना केले. पोलीसांनी तत्काळ कारवाई करत मारहाण करणाऱ्या दोन इसमांना जागेवरच पकडले.



स्थानिक नागरिकांकडून चौकशी केली असता, आरोपींनी चाकूचा धाक दाखवून फिर्यादी राहुल शंकर चौरसिया (वय २५) यांच्याकडील खिशातील ४ हजार रोख रक्कम लुटल्याचे उघड झाले. तसेच, आरोपींनी हवेत चाकू फिरवून नागरिकांना धमकावल्याची ही माहिती मिळाली.

**ताब्यात घेतलेल्या आरोपींची नावे पुढीलप्रमाणे आहेत :-**

१) तेजस राजू देवरूखकर (वय २३ वर्षे, रा.डोंबिवली पूर्व)

२) सुजित विजय थोरात (वय २० वर्षे, रा.डोंबिवली पूर्व)

त्यांच्याकडून चोरीस गेलेली रोख रक्कम व एक स्टीलचा चाकू जप्त करण्यात आला आहे. फिर्यादीवरून डोंबिवली पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नं. ३४०/२०२५ नोंदवण्यात आला असून भारतीय दंड विधान कलम ३०९(६), ११५(२), ३५१(२), ३(५) तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१), १३५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपींना न्यायालयात हजर केले असता, त्यांना एका दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे आरोपींकडून चोरीस गेलेली सर्व रक्कम आणि वापरलेला चाकू १०० टक्के हस्तगत करण्यात आले आहेत. तेजस देवरूखकर यांच्यावर मानपाडा पोलीस ठाण्यात आर्म्स ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल आहे.

तर सुजित थोरात याच्यावर टिळकनगर पोलीस ठाण्यात घरफोडी, चोरी आणि एनडीपीएस कायद्याअंतर्गत तीन गुन्हे नोंदवले आहेत. ही कामगिरी पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०३ कल्याण, सहायक पोलीस आयुक्त डोंबिवली विभाग आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक डोंबिवली पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि बळवंत भराडे, पोउनि सचिन देसाई आणि त्यांच्या पथकाने केली. पुढील तपास पोलीस उप निरीक्षक सचिन देसाई करीत आहेत.

# प्रकल्पग्रस्तांच्या नोकरीसाठी खा.धानोरकर यांची आक्रमक भूमिका; जिल्हाधिकाऱ्यांकडे तातडीने बैठक घेणार

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२९, चंद्रपूर :** राजुरा तालुक्यातील गोवरी पौनी विस्तार योजनेतील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रलंबित नोकरी व इतर महत्वाच्या मागण्यांसाठी खासदार प्रतिभा धानोरकर यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कासाठी त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे तातडीने बैठक आयोजित करण्याची पत्राद्वारे मागणी केली आहे. गोवरी पवनी विस्तार योजनेमुळे विस्थापित झालेल्या शेतकऱ्यांच्या नोकरी आणि पुनर्वसनासारख्या समस्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. यासंदर्भात शेतकऱ्यांनी वारंवार पाठपुरावा केला, मात्र अद्याप त्यांच्या मागण्या पूर्ण



झालेल्या नाहीत. यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे.

खासदार प्रतिभा धानोरकर यांनी शेतकऱ्यांच्या समस्यांची दखल घेत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. या निवेदनात त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या विस्तृतपणे मांडल्या आहेत. यात प्रामुख्याने नोकरी संबंधीची प्रलंबित फाईल त्वरीत मंजूर करणे, सर्व पात्र प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना दोन महिन्याच्या आत नोकरी देणे, अधिग्रहित जमिनीच्या ठिकाणीच नोकरी उपलब्ध करणे, आणि जोपर्यंत नोकरी मिळत नाही तोपर्यंत जमीन संपादनाची प्रक्रिया थांबविणे या प्रमुख मागण्यांचा समावेश आहे.

या व्यतिरिक्त नोकरी वाटपात कोणताही भेदभाव न करता सर्व पात्र शेतकऱ्यांना एकाच वेळी सामावून घेणे, शेतकऱ्यांशी चर्चा करतांना वेकोलिच्या उच्च अधिकाऱ्यांनी उपस्थित राहणे, एसओपीचा मुद्दा रद्द करणे, कोरपना तालुक्यातील विरुर (गाडेगाव) येथील जमीन संपादन आणि मातीच्या ढिगाऱ्यांमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई करणे. तसेच सांगोळा येथील विशिष्ट सर्वे नंबर आणि वेकोल्च्या खाणकामामुळे होणाऱ्या समस्यांवर तोडगा काढण्याची मागणीही खासदार धानोरकर यांनी केली आहे.

खासदार प्रतिभा धानोरकर यांनी शेतकऱ्यांच्या समस्यांची गांभीर्याने दखल घेतली असून जिल्हाधिकारी आणि वेकोलिच्या संबंधित अधिकाऱ्यांसोबत तातडीने बैठक आयोजित करण्याची मागणी केली आहे. प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत, असे आश्वासन खासदार धानोरकर यांनी दिले आहे.

# मंडणगडमध्ये 'यशतेज फाउंडेशन' तर्फे भव्य जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धा संपन्न

**अक्षराज : उमेश तबीब**

**दि.२९, दापोली (रत्नागिरी) :** यशतेज फाउंडेशन संस्थापक - ॲड.यश घोसलकर यांच्या वतीने आयोजित भव्य जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धा मंडणगड येथे मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडली. या स्पर्धेच्या उद्धाटनप्रसंगी विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली होती. या स्पर्धेचे उद्धाटन विशाल जाधव (गटविकास अधिकारी, मंडणगड)-इूज, अक्षय ढाकणे (तहसीलदार, मंडणगड), अभिजीत कुंभार (मुख्याधिकारी, नगरपंचायत मंडणगड), नितीन गवारे (पोलीस निरीक्षक, मंडणगड), एन.के. शिंदे (गटशिक्षण अधिकारी, मंडणगड), डॉ.विकास शेटे, ॲड.श्रीकांत जाधव , ॲड.अरुण ढंग, राम राठोड, राजेश इंगळे व दिनेश सापटे यांच्या प्रमुख उपस्थितीत



संपन्न झाला. बुद्धिबळ मुख्य ऑर्बिटर म्हणून विनायक माने, सह ऑर्बिटर म्हणून श्रेया सोनकर आणि कल्पेश लिमये यांनी स्पर्धेचे यशस्वी संचालन केले.

या स्पर्धेत संपूर्ण जिल्ह्यातून एकूण १२७ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. विविध वयोगटातील विजेते पुढीलप्रमाणे :-

**८ वर्षाखालील गट :-**
१ले - संभाजी निखिल पिंपळे
२रे - स्वस्तिक रुपेश पवार
३रे - शिवराज प्रवीण काळे

**१० वर्षाखालील गट :-**
१ले - विपुल क्रांतीदूत फडके
२रे - शिव समीर गवस
३रे - सानिस सागर बुटाला

**१२ वर्षाखालील गट :-**
१ली - समृद्धी सतीश खैरे
२रे - गुरुराज रोहित दळवी
३रे - साईराज तुकाराम थोरात

**१४ वर्षाखालील गट :-**
१ला - हर्ष गणेश चव्हाण
२रा - युवराज सुशील देवघरकर
३रा - शौर्य समीर गवस

**१६ वर्षाखालील गट :-**
१ला - वेद कमलाकर कांबळे
२रा - प्रीत ललित जैन
३रा - मयूर मंगेश गणवे


दापोली, खेड व मंडणगडचे विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत शानदार कामगिरी करत भरघोस यश संपादन केले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबद्दल भारताचे ग्रँड मास्टर व इंडिया लेडीज टीमचे कोच अभिजीत कुंटे यांनीदेखील स्वतःहून एक व्हिडिओ बनवून एस एस फाउंडेशनच्या कामगिरीचे अभिनंदन केले.

तसेच श्रीराम खैरे महाराष्ट्र चेस असोसिएशनचे जॉईंट सेक्रेटरी यांनी देखील अभिनंदन आचा स्वतः चा व्हिडिओ पाठवून यशतेज फाउंडेशनचे कौतुक केले. यशतेज फाउंडेशनचे सर्वत्र कौतुक होत आहे. सर्व विजेत्यांना ट्रॉफी, प्रमाणपत्र आणि रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले.

# के.रामलू शाळेतील IIT-JEE व NEET फाउंडेशनच्या विद्यार्थ्यांचा सत्कार

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२९, कुंडलवाडी (नांदेड) :** कुंडलवाडीयेथील के.रामलू शाळेत शैक्षणिक वर्ष २०२४ -२५ च्या IIT-JEE, NEET फाउंडेशन बरोबरच नर्सरी ते यूकेजीच्या विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण व गुणगौरव सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे संस्थापक अध्यक्ष सायरेड्डी ठक्कूरवार तर प्रमुख पाहुणे डॉ.नरेश बोधनकर, पालक प्रतिनिधी सुरेश कोंडावार, सय्यद रियाज पाशा मौलीडौर यांच्या उपस्थितीत सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. नंतर प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, ज्ञान वाढीसाठी आपला पाया पक्का करणे आवश्यक आहे. आपल्या ग्रामीण भागामध्ये सोयीनुसार अशाप्रकारे फाउंडेशन वर्ग चालवणारी तालुक्यातील ही एकमेव शाळा असून या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या अभ्यासाकडे वैयक्तिक लक्ष दिले जाते. व नंतर अध्यक्षांनी विद्यार्थ्यांना आपल्या ग्रामीण भागातच जास्तीत जास्त सुविधा कशा



पुरवल्या जातील या दृष्टीने पूर्ण प्रयत्न करण्याचे आश्वासन पालकांना दिले. यात फाउंडेशनच्या वर्ग सहावीतीलगड्डवार श्रेया संजय प्रथम, कोलंबरे स्नेहिका राजेश्वर द्वितीय, पाशावार विश्वजीत सयाराम तृतीय वर्ग सातवीतीलजायेवार अंजया प्रथम, कोंडावार अनुश्री सुरेश द्वितीय, इबतेवार शितल बालाजी तृतीय, वर्ग ८ वी दीडशेरे प्रसाद चक्रधर प्रथम, पाठक श्रीजा प्रमोद द्वितीय, जजगेकर श्रेया पिराजी तृतीय क्रमांक प्राप्त केले.

अशा सर्व यश प्राप्त विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते रोख रक्कम प्रथम ६ हजार, द्वितीय ५ हजार, तृतीय ४ हजार रुपये, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यापुढे ही बक्षीसांची परंपरा चालू राहणार आहे. यासाठी पालक वर्गात शाळेचे कौतुक होत आहे. या सोबतच प्रत्येक वर्गातील टॉप टेन म्हणून समर्थ सावंत, अनुष्का शिंदे, समीक्षा चव्हाण, उदय पुप्पलवार, नैतिक तुंगेनवार, प्रियंका ठाकूर, स्नेहल शिंदे, रुद्रा मिरासे, तल्हा शेख, अनुष्का कोंडावार, हसन शेख, प्रथमेश अनंतवार, अनिकेत डेपावार, मॅकलवर श्रुतिका,श्रीगणेश मर्कंटेवार, ऋतुजा आकुलवार, श्रावणी बुडावार, लता ठक्कूरवार, सोहम बोंबले, विनायक शेरियाल, पुर्वजा कुलकर्णी, नशेरा शेख, क्रांती लिंगमपल्ले, सात्वीका कोलंबरे, अविनाश डोपावार, सुमित चाकटवार, शुभदा दरबस्तेवार, वरद येमेकर, लोकेश दर्शनवाढ, संकेत होर्के, पूजा शिंगारे अशा सर्व विद्यार्थ्यांचे गौरव करण्यात आले. बीडीएस, आयईओ, आयएमओ अशा स्पर्धा परीक्षांचे मेडल व प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. शाळेतील नर्सरी ते युकेजी च्या विद्यार्थ्यांना निकाल वितरीत करण्यात आले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पाठक संध्या तर आभार प्रदर्शन येमेकर नागनाथ यांनी केले. शाळेचे संस्थाध्यक्ष सायरेड्डी ठक्कूरवार, सचिव यशवंत, संगमवार संचालिका, रमा ठक्कूरवार, प्राचार्य संजू शेळके, मुख्याध्यापक मठवाले पापय्याअप्पा, पर्यवेक्षिका सपना म्हैसेवाड यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यां व त्यांचे पालक यांचे अभिनंदन व कौतूक केले. या कार्यक्रमासाठी शाळेच्या सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# थोडक्यात

## सातारा जिल्हा ग्रंथालय संघाच्या ५१ वे वार्षिक अधिवेशन

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.२९, खंडाळा (सातारा) :** सातारा येथे सातारा जिल्हा ग्रंथालय संघाच्या ५१ व्या वार्षिक अधिवेशनात खंडाळा (बावडा) येथील एकता सार्वजनिक वाचनालय



व ग्रंथालयाचा यशवंतराव चव्हाण आदर्श ग्रामीण ग्रंथालय पुरस्काराने गौरव करण्यात आला. अधिवेशनाचे उदघाटन माजी प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या प्रमुख उपस्थितीत व ज्येष्ठ विचारवंत व साहित्यिक डॉ.दत्तप्रसाद दाभोलकर, रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव डॉ.शिवलिंग मेनकुदळे, पुणे विभाग सहाय्यक ग्रंथालय संचालक शालिनी इंगोले, सातारा जिल्हा ग्रंथालय अधिकारी श्रीनिवास मंगलपल्ली, सुप्रसिद्ध वक्ते प्रा.निरंजन फरांदे इ.मान्यवरांच्या हस्ते एकता ग्रंथालय अध्यक्ष जितेंद्र गाढवे, संस्थापक सचिव विकास गाढवे, संचालक डॉ.दत्तात्रय खंडागळे, चंद्रकांत वाळकुंडे, घनश्याम शेंडे, हणमंत यादव,संचालिका योगिता गाढवे, ग्रंथपाल रेश्मा यादव यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. या पुरस्काराबद्दल शिक्षणमहर्षी शंकरराव गाढवे, खंडाळा विभाग शिक्षण समितीचे सचिव संजीव गाढवे, सर्व संचालक, पदाधिकारी, राजेंद्र विद्यालयाचे प्राचार्य शब्बीर नालबंद आणि सर्व शिक्षक व कार्यालयीन कर्मचारी वृंद,सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालय प्राचार्य डॉ.हणमंत जाधव सर्व प्राध्यापक व कर्मचारी वृंद, खंडाळा इंग्लिश मिडीयम स्कुल चे प्राचार्य जयवंत जगताप सर्व शिक्षक व कर्मचारी वृंद, खंडाळा पंचक्रोशीतील एकता ग्रंथालय व वाचनालय सभासद, वाचक, शुभचिंतक आदी मान्यवरांकडून शुभेच्छा देण्यात आल्या व शुभेच्छांचा ओघ सुरू आहे.

## अवैधरित्या राहणाऱ्या ६ बांग्लादेशी नागरिकांविरुद्ध पोलिसांची कारवाई



**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.२८, कल्याण (ठाणे) :** पोलीस आयुक्त ठाणे शहर यांचे आदेशान्वये दिनांक २८ एप्रिल २०२५ रोजी पोलीस उपआयुक्त परिमंडळ ३ कल्याण अंतर्गत पोलीस ठाणे अवैधरित्या वास्तव्य करत असलेले बांगलादेशी नागरिकांबाबत शोध मोहिम राबविण्यात आली होती. त्याअनुषगाने गोपनीय बातमीव्दारे कल्याण व डोबिवली शहरमधील संशयीत इसमांना पोलीस ठाणे येथे बोलावुन त्यांचेकडील आधार कार्ड, पॅन कार्ड व इतर कागदपत्रांची सखोल चौकशी करण्यात आली. संशयीत इसमांचे कागदपत्रे चौकशी दरम्यान एकुण ०६ बांगलादेशी नागरिक अवैधरित्या वास्तव्य करत असल्याचे निदर्शनास आल्याने त्यांचे विरूध्द पारपत्र (भारतात प्रवेश) अधिनियम १९२० चे कलम ३.४ विदेशी नागरिक कायदा १९४६ चे कलम १३.१४(अ) (ब) प्रमाणे कारवाई करून अनुक्रमे महात्मा फुले चौक पोलीस ठाणे-०१. खडकपाडा पोलीस ठाणे-०१, बाजारपेठ पोलीस ठाणे-०१ व टिळकनगर पोलीस ठाणे-०१ मध्ये असे एकुण ०४ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

सदर गुन्हयाचा पुढील तपास चालु आहे.त्याचप्रमाणे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३ कल्याण हददीत माहे जानेवारी २०२५ ते आज पावेतो एकुण ३८ अवैधरित्या वास्तव्य करणारे बांगलादेशी नागरिक विरूध्द एकुण १६ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. तरी यापुढे ही कल्याण व डोंबिवली शहरात अवैधरित्या राहणारे बांगलादेशी नागरिक विरूध्द कारवाई सुरू राहणार असल्याची पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी माहिती दिली.

## अनियमित पाणीपुरवठा संदर्भात ठाकरे शिवसेना पक्षाचे सिडको, पनवेल महानगरपालिकेला निवेदन

**अक्षराज : देवयानी कुलकर्णी**

**दि.२८, पनवेल (रायगड) :** गेल्या महिनाभराहून अधिक काळ खारघर शहरात सिडकोच्या माध्यमातून अपुरा व अनियमित पाणीपुरवठा होत आहे. व त्याकडे



सतत दुरुस्तीचे कारण देत सिडको टाळाटाळ करत आहे. पाणी टंचाईमुळे अनेक सोसायटया टँकर द्वारे पाणी विकत घेत असून, त्यांना आर्थिक बोजाही सहन करावा लागत आहे व त्यामुळे खारघरमधील सिडकोने बांधलेल्या सोसायटीतील सर्व नागरिक त्रस्त आहेत. अनेक गृहनिर्माण संस्थानी पाणी सुरळीतपणे मिळावे. याकरिता निवेदन दिली आहेत. परंतु सिडको केवळ आश्वासन देत दुर्लक्ष करत असल्याने दिनांक २८ एप्रिल २०२५ रोजी शिवसेना रायगड जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्या सूचनेनुसार खारघर शहर समन्वयक रामचंद्र देवरे, उपशहर प्रमुख नंदु वारुंगसे, प्रशांत जांभुळकर, विभागप्रमुख उत्तम मोर्बेकर, शिव आरोग्य सेनेचे खारघर शहर समन्वयक सचिन सावंत, शाखाप्रमुख आप्पा वारंग यांनी सिडको पाणीपुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंता गायकवाड व सहाय्यक कार्यकारी अभियंता देवरे सर यांना निवेदन देऊन अपुऱ्या व अनियमित होत असलेल्या पाणीपुरवठया बाबतीत चर्चा करण्यात आली.

दुरुस्तीची कामे बऱ्यापैकी झाली असून काही अंशी कामे बाकी असल्याने तसेच कधी एम.आय.डी.सी. तर कधी नवी मुंबई महानगरपालिका शटडाऊन घेत असल्याने पाणी वितरणावर परिणाम होत असून अपुरा व अनियमित पाणीपुरवठा होत असल्याची बाब मान्य करण्यात आली. पाणी वितरणात नियमितता यावी. पूर्वीप्रमाणे पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील असून पुढील दोन दिवसात पूर्वीप्रमाणे पाणीपुरवठा सुरु करण्याचे प्रयत्न करणार असल्याचे सांगण्यात आले. तसेच पनवेल महानगरपालिका मालमत्ता कराच्या बिलात पाणी लाभकर आकारत असल्याने पनवेल नगरपालिकेच्या आयुक्तांना निवेदन देण्यात आले.